

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## परिपत्रक

**संदर्भ : जा.क्र. पुअहोसोविसो/कु.का./२०२०/३७८०, दि. ०६/०६/२०२० रोजीचे**

उपरोक्त संदर्भान्वये मा. अध्यक्ष / संस्थाचालक / संस्था सचिव / प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व मान्यताप्राप्त संस्था व महाविद्यालये तसेच विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलांचे मा. संचालक व प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की दि. ०१ ऑगस्ट, २०२० रोजी देण्यात येणाऱ्या १) जीवनगौरव पुरस्कार २) उत्कृष्ठ शैक्षणिक संस्था पुरस्कार ३) उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार ४) उत्कृष्ठ प्राचार्य पुरस्कार ५) उत्कृष्ठ शिक्षक पुरस्कार आणि ६) उत्कृष्ठ शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार या पुरस्कारासाठी इच्छूक व पात्र शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आपले प्रस्ताव विहित नमुन्यात व विहित मार्गाने तीन प्रतीमध्ये दि. ३०/०६/२०२० पर्यंत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. उपरोक्त पुरस्कारासाठीची नियमावली व विहित अर्जाचा नमुना विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावर Circular/Notice आणि Download या मथळयाखाली प्रसिध्द करण्यात आला आहे.

परंतु कोव्हिड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावाने निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे अनेकांना आपले प्रस्ताव विहित मुदतीत सादर करता आले नाहीत. या बाबीचा विचार करता वरील पुरस्कारासाठीचे प्रस्ताव सादर करण्यासाठी दि. ०६/०७/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदरची बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

कळावे.

(प्रा. डॉ. विकास घुटे)
कुलसचिव

जा.क्र. पुअहोसोविसो/कु.का./२०२०/3936
दिनांक : 30 JUN 2020

**सोबत - उपरोक्तप्रमाणे**

प्रत : १. मा. कुलगुरु कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
२. मा. प्र-कुलगुरु कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
३. मा. कुलसचिव कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
४. मा. अध्यक्ष / संस्थाचालक / संस्थासचिव / प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये तसेच विद्यापीठ परिसरातील सर्व प्रशासकीय विभागप्रमुख/मा. संचालक यांनी सदरचे परिपत्रक आपल्या महाविद्यालयात/विभागात/संकुलात सूचना फलकावर लावून सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर



## परिपत्रक

मा. अध्यक्ष / संस्थाचालक / संस्था सचिव / प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व मान्यताप्राप्त संस्था व महाविद्यालये तसेच विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलांचे मा. संचालक व प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यास अत्यंत आनंद होतो की, प्रतीवर्षाप्रमाणे यावर्षीही विद्यापीठाच्यावतीने विद्यापीठ वर्धापनदिनाचे औचित्य साधून दि. ०१ ऑगस्ट, २०२० रोजी विविध पुरस्कार देण्यात येणार आहे. त्यामध्ये खालील पुरस्कारांचा समावेश आहे.

१) उत्कृष्ठ शैक्षणिक संस्था पुरस्कार
२) उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार
३) उत्कृष्ठ प्राचार्य पुरस्कार
४) उत्कृष्ठ शिक्षक पुरस्कार
५) उत्कृष्ठ शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार

उपरोक्त पुरस्कारासाठीची नियमावली व विहित अर्जाचा नमुना विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावर Circular/Notice आणि Download या मथळयाखाली प्रसिध्द करण्यात आला आहे. तरी इच्छूक व पात्र शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आपले अर्ज विहित नमुन्यात व विहित मार्गाने तीन प्रतीमध्ये दि. ३०/०६/२०२० पर्यंत मा. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर - पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ केगाव, सोलापूर - ४१३ २५५ या पत्त्यावर हस्तदेय/पोस्टाद्वारे/कुरीअरद्वारे सादर करावेत/पाठवावेत.

सदरील अर्ज सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील. विहित मुदतीनंतर प्राप्त प्रस्तावांचा आणि विहित नमुन्यात व विहित मार्गाने पाठविण्यात न आलेल्या प्रस्तावांचा उपरोक्त पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

कळावे.

(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)
कुलसचिव

**जा.क्र. पुअहोसोविसो/कु.का./२०२०/**3780
**दिनांक :** 6 JUN 2020

**सोबत :** सर्व पुरस्कारांची नियमावली व अर्जाचे नमुने

**प्रत :** १. मा. कुलगुरु कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
२. मा. प्र-कुलगुरु कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
३. मा. कुलसचिव कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
४. मा. अध्यक्ष / संस्थाचालक / संस्थासचिव / प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये तसेच विद्यापीठ परिसरातील सर्व प्रशासकीय विभागप्रमुख/मा. संचालक यांनी सदरचे परिपत्रक आपल्या महाविद्यालयात / विभागात / संकुलात सूचना फलकावर लावून सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.